Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 4TH AUGUST 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८८४ चा देशांतील आगीच्या गलबतांविषयींचा आक्ट आणखी सुधारण्याबाबत आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थीं सन १८८४ चा देशांतील आगीच्या गलबतांविषयींचा आक्ट (यास यांत पुढें " सदरहू आक्ट " असें ह्मटलें आहे) आणखी सुधारणें योग्य आहे; त्या अर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

लहान सरनामा व सुरुवात.

१. (१) या आक्टास सन १८९८ चा देशांतील आगीच्या गलबतांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा) सुधारण्याबाबत आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो एकदम अमलांत येईल.

सन १८८४ च्या ६ व्या आक्टाच्या ६ व्या बाबीच्या मथाळ्याची सुधारणूक.

२. सदरहू आक्टाच्या ६ व्या बाबीच्या मथाळ्याच्या मजकुरांत, " आगीच्या भयापासून " या शब्दांनंतर " व तीं एकमेकांवर आदळण्यापासून " हे शब्द दाखल करावे.

सन १८८४ च्या ६ व्या आक्टाच्या ५० व्या कलमानंतर नवीन कलम दाखल करणें.

३. सदरहू आक्टाच्या ५० व्या कलमानंतर, खालीं दिलेलें कलम दाखल करावें, ह्मणजे:—

देशांतील आगीच्या गलबतांचें एकमेकांवर आदळण्यापासून संरक्षण करण्यासाठीं कानू करण्याचा स्थानिक सरकारचा अधिकार.

" ५० अ. (१) देशांतील आगीच्या गलबतांचें एकमेकांवर आदळण्यापासून संरक्षण करण्यासाठीं कानू करण्याचा स्थानिक सरकारास अधिकार आहे.

" (२) या कलमाअन्वयें कानू करावयाच्या त्यांत दुसऱ्या गोष्टींबरोबर आणखी खालीं लिहिलेल्या गोष्टींचें नियमन करण्याचा अधिकार आहे, ह्मणजे—

(अ) वाजविण्याच्या सिग्नली करण्याचें;

(ब) दिवे नेण्याचें व ते रात्रीच्या वेळीं दाखविण्याचें;

(क) गलबतें वळविण्याबाबतचे जे नियम पाळावयाचे त्या नियमांचें; आणि

(ड) पिछाडीस किंवा बाजूस पागड बांधून गलबतें नेण्याचें.

" (३) या कलमाअन्वयें केलेल्या कोणत्याहि कानूंत, ती जो कोणताहि मनुष्य तोडील त्यास पराकाष्ठा साहा महिनेपर्यंत कैदेची, किंवा पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील असा ठराव करण्याचा अधिकार आहे."

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

देशांतील आगीचीं गलबतें समुद्रावर चालत असतां त्यांमध्यें उतारू असोत अगर नसोत तीं एकमेकांवर आदळण्यापासून त्यांचें संरक्षण करण्यासाठीं कानू करणें जरूर आहे असें नुक्तेंच हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आणलें होतें, आणि सन १८८४ चा देशांतील आगीच्या गलबतांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ६ वा) यावरून या कारणासाठीं जरूर असलेले अधिकार देण्यांत आलेले नाहींत असें आढळून आलें होतें. यास्तव सदरहू विषयावर योग्य कानू करतां येण्यासाठीं सन १८८४ चा सदरहू आक्ट आणखी सुधारावा असा या मसुद्याचा हेतु आहे.

(सही) जे. वेस्टलण्ड.

तारख १७ माहे जून, सन १८९८.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

---

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.